दैनिक
बीड महाराष्ट्र |गुरुवार , 3 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 115 |वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# महाराष्ट्रात पावसाची उघडीप कायम; विदर्भ-मराठवाड्यात जोरदार सरींचा अंदाज

**मुंबई : वृत्तसंस्था**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर काहीसा कमी झाला असून अनेक भागांत पावसाची उघडीप पाहायला मिळत आहे. काही ठिकाणी हलक्या ते मध्यम सरी हजेरी लावत असल्या तरी सर्वदूर पाऊस होत नसल्याने शेतकऱ्यांना दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दरम्यान, आज विदर्भातील काही जिल्ह्यांसह मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

आज नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा आणि अमरावती या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यातील नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांतही काही ठिकाणी जोरदार सरींची शक्यता आहे. याशिवाय नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि परभणी जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलक्या सरी पडण्याचा अंदाज आहे. राज्यातील उर्वरित भागात ऊन-सावल्यांचा खेळ सुरू राहण्याची शक्यता असून काही ठिकाणी हलक्या पावसाचा शिडकावा होऊ शकतो.



## उद्या विदर्भात ऑरेंज अलर्ट

उद्याच्या हवामानाबाबत विदर्भातील अमरावती आणि गोंदिया जिल्ह्यांना जोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर नागपूर, वर्धा, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलढाणा, चंद्रपूर, भंडारा आणि गडचिरोली या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातील जळगाव तसेच मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही जोरदार पावसाचा अंदाज आहे. दुसरीकडे नंदुरबार, धुळे, नाशिक, अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, जालना, परभणी, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांत हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, पश्चिम झारखंड आणि परिसरातील ठळक कमी दाबाचे क्षेत्र ईशान्य मध्य प्रदेश आणि परिसरात पोहोचले आहे. या प्रणालीशी संबंधित चक्राकार वाऱ्यांची स्थिती समुद्रसपाटीपासून सुमारे ७.६ किलोमीटर उंचीपर्यंत विस्तारली आहे. पुढील १२ तासांत हे ठळक कमी दाबाचे क्षेत्र कमकुवत होऊन कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. पुढील २४ तासांत ही हवामान प्रणाली दक्षिण उत्तर प्रदेश आणि उत्तर मध्य प्रदेशातून पश्चिम-वायव्य दिशेने सरकण्याचा अंदाज आहे. तसेच सध्या मॉन्सून आसही या कमी दाबाच्या क्षेत्रातून पुढे बंगालच्या उपसागरापर्यंत विस्तारलेली आहे. वायव्य उत्तर प्रदेशापासून बांगलादेशापर्यंत आणखी एक कमी दाबाचा पट्टा सक्रिय असून तो ईशान्य मध्य प्रदेश, झारखंड आणि गंगेच्या पश्चिम बंगालवरील चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीतून जात आहे. त्यामुळे राज्यातील काही भागांत पावसासाठी पोषक वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे.

# 'यशवंतराव'च्या मॉर्निंग ट्रॅकवर ही होतोय गुणवंतांचा सत्कार

## दिनेश पवार यांच्या निवडी बद्दल केला सत्कार शिक्षक मैत्री प्रतिष्ठान चा पुढाकार

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा मॉर्निंग ट्रॅक सध्या अनेक चांगल्या उपक्रमामुळे सध्या चर्चेत येत आहे. या मॉर्निंग ट्रॅक वर दररोज किमान 500 तरुण आणि अनेक सिनियर सिटीझन नियमितपणे दररोज फिरण्यासाठी येतात. या मैदानावर नियमित फिरण्यासाठी येणाऱ्या अनेकांची विविध क्षेत्रात नियुक्त्या होत असतात. अशा नियुक्त्या मुला-मुलींचा सत्कार करून त्यांच्या पाठीवर थाप मारण्याचे काम सतत अनेक जण करीत असतात.

**दिनेश पवार यांचा सत्कार**

याच मैदानावर गेली अनेक वर्षांपासून पोलीस भरती साठी मुला-मुलींचे प्रशिक्षण घेणा-या दिनेश पवार यांचा नाशिक जिल्ह्यातील एका खाजगी शिक्षण संस्थेत क्रिडा शिक्षक म्हणून शिक्षक भरती पवित्र पोर्टल च्या माध्यमातून निवड झाली आहे.


**यश शिक्षक मैत्री चा पुढाकार**

या निवडीचे औचित्य साधून शिक्षक मैत्री प्रतिष्ठान ने पुढाकार घेत दिनेश पवार यांचा सत्कार घडवून आणला. यावेळी शिक्षक मैत्री प्रतिष्ठान चे अध्यक्ष विजय रापतवार यांनी सत्कारामागची पार्श्वभूमी सांगितली.

**मान्यवरांची उपस्थिती**

सकाळचा मॉर्निंग वॉक व सुक्ष्म व्यायाम संपल्यानंतर दिनेश पवार यांचा आ. धनंजय मुंडे यांचे स्वीय सहायक खंडु गोरे, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक सय्यद पाशु मिया, शिक्षक मैत्री प्रतिष्ठान चे अध्यक्ष विजय रापतवार, प्रभारी तालुका क्रिडा अधिकारी दत्तात्रय देवकते, उद्योजक चंद्रशेखर वडमारे, ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, डॉ. सुरेश आरसुडे, उद्योजक रवि चव्हाण यांच्यासह पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण घेणारे मुले-मुली व मॉर्निंग ट्रॅक वर फिरण्यासाठी येणारे अनेक मान्यवर उपस्थित होते.





# आष्टी मतदारसंघात तीव्र पाणी व चारा टंचाई; चारा डेपो सुरु करण्याची आ. सुरेश धस यांची मागणी

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) या तालुक्यांमध्ये पावसाअभावी तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, त्याचा परिणाम पशुधनावरही होत आहे. जनावरांसाठी चाऱ्याची गंभीर टंचाई निर्माण झाल्याने तातडीने शासकीय चारा डेपो सुरू करण्यात यावेत, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शेतकरी व पशुपालक संकटात सापडले आहेत. अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती गंभीर बनली असून, जनावरांसाठी पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्नही दिवसेंदिवस तीव्र होत आहे. मतदारसंघात दूध उत्पादन व पशुपालन हा अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रमुख व्यवसाय आहे. मात्र, पावसाअभावी चाऱ्याचे उत्पादन घटले असून बाजारातील चाऱ्याचे दर वाढल्याने पशुपालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे पशुधन सांभाळणे शेतकरी व पशुपालकांसाठी मोठे आव्हान बनले आहे.

# नाशिक म्हाडा भूखंड फसवणूक प्रकरणात मोठी कारवाई, मंडळ अधिकाऱ्यासह तीन तलाठ्यांचे निलंबन

**नाशिक वृत्तसंस्था**

**नाशिकमधील बहुचर्चित म्हाडा भूखंड फसवणूक प्रकरणात अखेर महसूल प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या प्रकरणात बेकायदेशीरपणे काम केल्याचा ठपका ठेवत एका मंडळ अधिकाऱ्यासह तीन तत्कालीन तलाठ्यांना निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे नाशिकच्या महसूल विभागात मोठी खळबळ उडाली असून, या प्रकरणातील आणखी कोणावर कारवाई होणार, याकडे लक्ष लागले आहे.**




**एसआयटी चौकशीत दोष सिद्ध**

म्हसरूळ, गंगापूर आणि नाशिक शहर-१ या भागांतील तत्कालीन तलाठी आणि अधिकाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. म्हाडा भूखंड फसवणूक प्रकरणाच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक अर्थात एसआयटी स्थापन करण्यात आली होती. या एसआयटीकडून संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यकाळातील कार्यालयीन दप्तराची सखोल तपासणी करण्यात आली. कागदपत्रांची छाननी आणि चौकशीदरम्यान संबंधित अधिकारी दोषी आढळून आल्यानंतर निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडून त्यांच्या निलंबनाचे आदेश जारी करण्यात आले.

**कागदोपत्री फेरफार केल्याचा आरोप**

नियमांनुसार, एक एकरपेक्षा अधिक क्षेत्रावर बांधकाम असलेल्या काही गृहप्रकल्पांमध्ये ठरावीक घरे म्हाडाला हस्तांतरित करणे विकासकांसाठी बंधनकारक असते. ही घरे म्हाडाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना तुलनेने कमी दरात उपलब्ध करून दिली जातात. मात्र, नाशिकमधील या प्रकरणात एक एकरपेक्षा अधिक क्षेत्रावर बांधकाम झालेले असतानाही कागदोपत्री फेरफार करून प्रकल्पाचे क्षेत्रफळ एक एकरपेक्षा कमी असल्याचे दाखवण्यात आल्याचा आरोप आहे. या फेरफारामुळे संबंधित प्रकल्प म्हाडाच्या नियमांच्या कक्षेबाहेर दाखवण्यात आला आणि म्हाडाला मिळणारी घरे हडप करण्यात आल्याचे तपासातून समोर आले आहे.

**बांधकाम व्यावसायिकांसह अधिकाऱ्यांवरही गुन्हे**

या प्रकरणात यापूर्वीच अनेक बड्या बांधकाम व्यावसायिकांसह शासकीय अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एसआयटीच्या तपासातून संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कथित बेकायदेशीर कामांचा उलगडा झाल्यानंतर आता प्रशासनाने निलंबनाची कारवाई सुरू केली आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली असून, म्हाडा भूखंड फसवणूक प्रकरणातील तपासाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे. आगामी काळात या प्रकरणात आणखी कोणत्या अधिकारी किंवा बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई होते, याकडे नाशिककरांचे लक्ष लागले आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये स्वाईन फ्लूचा वाढता धोका ; ऑगस्टमध्ये 31 रुग्ण, पालिकेचा सावधगिरीचा इशारा

**पिंपरी-चिंचवड :**

ऐन सणासुदीच्या तोंडावर पिंपरी-चिंचवडकरांची चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. शहरात स्वाईन फ्लूने पुन्हा डोके वर काढले असून ऑगस्ट महिन्यात तब्बल 31 रुग्ण आढळले आहेत. मात्र, सुदैवाने सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

शहरात यावर्षी जानेवारी महिन्यात स्वाईन फ्लूचा 1 रुग्ण आढळला होता. त्यानंतर जुलैमध्ये 5 रुग्णांची नोंद झाली. मात्र ऑगस्टमध्ये रुग्णसंख्येत अचानक वाढ होऊन 31 जणांना स्वाईन फ्लूची लागण झाल्याचे समोर आले आहे.

मंडळातील किमान ८ ते १० स्वयंसेवकांना मिळणार प्रशिक्षण मुंबई ( विशेष प्रतिनिधी) : मुंबईतील सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळांनी उत्सव साजरा करताना कोणती .गेल्या काही वर्षांच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास 2022 मध्ये पिंपरी-चिंचवडमध्ये स्वाईन फ्लूचे 58 रुग्ण आढळले होते. त्यापैकी ऑगस्ट महिन्यात 34 रुग्णांची नोंद झाली होती. तर 2024 मध्ये शहरात 15 रुग्णांना स्वाईन फ्लूची लागण झाली होती.




दरम्यान, गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्यामुळे नागरिकांनी गर्दीच्या ठिकाणी जाणे शक्यतो टाळावे, मास्कचा वापर करावा आणि वारंवार हात स्वच्छ धुवावेत, असा सल्ला महापालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला आहे. सर्दी, खोकला किंवा तापाची लक्षणे आढळल्यास स्वतःहून औषधे घेण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

स्वाईन फ्लू म्हणजे काय?

स्वाईन फ्लूला H1N1 फ्लू असेही म्हटले जाते. हा इन्फ्लूएन्झा विषाणूमुळे होणारा श्वसनाचा संसर्ग आहे. संक्रमित व्यक्तीच्या खोकताना किंवा शिंकताना बाहेर पडणाऱ्या थेंबांमधून याचा प्रसार होऊ शकतो. तसेच संक्रमित व्यक्ती किंवा दूषित वस्तूंना स्पर्श केल्यानंतर नाक, तोंड किंवा डोळ्यांना हात लावल्यासही संसर्ग होण्याची शक्यता असते.

# काळाचा घाला ! आजीच्या अंत्यसंस्कारासाठी जात असलेल्या युवकाचा अपघाती मृत्यू

**नाशिक वृत्तसंस्था :**

सातपूर औद्योगिक वसाहतीतील नीलय मेटल कंपनीसमोर मंगळवारी (दि. १) सकाळी झालेल्या अपघातात ४३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. सुजित राजेंद्र गायकवाड असे मृत युवकाचे नाव आहे. आजीच्या अंत्यसंस्कारासाठी जात असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला.

**नेमकं काय घडलं ?**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुजित गायकवाड हे जेलरोड परिसरातील जुना सायखेडा रोड भागात राहत होते. ते एमएनजीएल गॅस कंपनीत सुपरवायझर म्हणून कार्यरत होते आणि सातपूर विभागाची जबाबदारी त्यांच्याकडे




होती. मंगळवारी नेहमीप्रमाणे कामावर आल्यानंतर आजीच्या निधनामुळे ते अंत्यसंस्कारासाठी घरी निघाले. नीलय मेटल कंपनीसमोरील मारुती मंदिराजवळील उतारावर रस्ता निसरडा असल्याने त्यांची दुचाकी घसरली अन् तोल जाऊन ते रस्त्यावर पडले. त्याचवेळी समोरून येणाऱ्या छोटा हत्ती वाहनाची त्यांना धडक बसली. या अपघातात सुजित यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. नागरिकांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

**कुटुंबातील एकमेव कमावता आधार हरपला**

सुजित हे कुटुंबातील एकमेव कमावते व्यक्ती होते. त्यांच्या वडिलांचे १२ वर्षांपूर्वी निधन झाले होते, तर आईचे कोरोना काळात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि १२ वर्षांची मुलगी आहे. त्यांची पत्नी सहा महिन्यांची गर्भवती आहे. अचानक झालेल्या या अपघातामुळे गायकवाड कुटुंबावर मोठे संकट कोसळले असून, कुटुंबातील कमावत्या व्यक्तीच्या निधनाने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# संपादकीय

## एका भाषायोगिनीचे प्रयाण

'मूर्तिमंत मराठीप्रेम' या दोन शब्दांत ज्यांचे यथार्थ वर्णन करता येईल त्या प्रा. यास्मिन शेख यांनी सोमवार, २४ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजता वयाच्या एकशेएकाव्या वर्षी शेवटचा श्वास घेतला. भाषेबद्दलची कुठलीही शंका जिला कधीही निःसंकोच विचारता येईल अशी एक हक्काची व्यक्ती आता आपल्यात उरलेली नाही या जाणिवेतून एक रितेपण मनात दाटून आले.

त्या जन्माने ज्यू. नाव जेरुशा रूबेन. तिला लहानपणापासून वाचनाची प्रचंड आवड. खांडेकर, फडके, माडखोलकर, नाथमाधव यांची पुस्तके; 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर', 'सत्यकथा' अशी मासिके आणि 'नवयुग', 'चित्रा', 'मौज', 'झंकार' अशी साप्ताहिके वाचनालयातून मिळत. 'झंकार'मध्ये 'उपेक्षितांचे अंतरंग' या शीर्षकाखाली प्रा. श्री. म. माटे यांच्या कथा प्रसिद्ध होत होत्या. त्या कथांतून माटे यांची दलितांविषयीची नितांत पोटतिडीक, अनुभवांचा सच्चेपणा आणि भाषाशैली यांचा जेरुशाच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला. भाषेची गोडी मनात रुजली. अनेक लेखक वाचनप्रेमातून लेखनाकडे वळल्याचे आपल्याला ठाऊक आहे. जेरुशाच्या बाबतीत वाचनप्रेमातून भाषाप्रेम असा प्रवास झाला.

तसे रुबेन यांनी घर नाशिकला बांधले होते, पण उच्चशिक्षणासाठी कुटुंब पुण्यात मुक्कामाला होते. जेरुशाने पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि त्याचवेळी 'मराठी कॉम्पोझिशन' हा ऐच्छिक विषय घ्यायचा निश्चय केला. मराठी भाषेविषयी वाटणारे अपरंपार प्रेम हे एक कारण होतेच; पण 'उपेक्षितांचे अंतरंग' लिहिणारे माटे मराठी विषय शिकवणार हेही एक महत्त्वाचे कारण होते. माटे यांनी तिला आपली मुलगीच मानले होते.

१९४६ साली जेरुशा बीए झाली; केवळ मराठीतच नव्हे, तर सर्वच विषयांच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून. प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांनी तिला एमएसाठी फेलोशिपही दिली; पण त्या काळात काही आजारपणामुळे तिला नाशिकला जावे लागले. त्यावेळी एमएसाठी पुस्तके कुठे मिळतील ह्याची चौकशी करण्यासाठी वडिलांबरोबर ती सुप्रसिद्ध नाटककार प्रा. वसंत कानेटकर ह्यांच्या निवासस्थानी गेली. मुसळधार पावसात चिंब भिजलेल्या अवस्थेत! कानेटकरांना तिचे अतिशय कौतुक वाटले. त्यांनी आवश्यक ती पुस्तके तर मिळवून दिलीच, पण शिवाय जेरुशाची व अझीज शेख ह्या तेथील चित्रमंदिरात मॅनेजर असलेल्या एका देखण्या, उमद्या, मुस्लिम तरुणाची ओळख करून दिली. कानेटकर ह्यांच्याच पुढाकाराने पुढे १९५० साली दोघांचे लग्न झाले, मिस जेरुशा रुबेन मिसेस यास्मिन शेख बनल्या; त्यांनी धर्म मात्र कधीच बदलला नाही.

एमए झाल्यानंतर शेखबाईंनी औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयात दोन वर्षे अध्यापन केले. नंतर मुंबईला शीव येथील एस.आय.इ.एस. महाविद्यालयात त्यांनी २७ वर्षे अध्यापन केले. इथेच विंदा करंदीकर इंग्रजी व चंद्रकांत बांदिवडेकर हिंदी शिकवत. श्री. पु. भागवत मराठीचे विभागप्रमुख होते; शेवटची सात वर्षे शेखबाई विभागप्रमुख होत्या. निवृत्तीनंतर दहा वर्षे त्या यू.पी.एस.सी.च्या परीक्षार्थींना मराठी शिकवत. एकूण ४४ वर्षे त्यांनी मराठीचे अध्यापन केले. पाठाची पूर्वतयारी केल्याशिवाय, टिपणे काढल्याशिवाय त्या कधीही वर्गावर गेल्या नाहीत. व्याकरणासारखा क्लिष्ट विषयही अगदी सोप्या शब्दांत समजावून सांगण्याची त्यांची हातोटी. त्यामुळेच एक विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती आणि अनेक माजी विद्यार्थी त्यांच्या कायम संपर्कात असत. व्याकरणाचे शासनमान्य नियम सोप्या भाषेत समजावून सांगणारे पुस्तक लिहावे अशी सूचना राज्य मराठी विकास संस्थेच्या अध्यक्ष डॉ. सरोजिनी वैद्य यांनी शेखबाईंना केली. त्यातून 'मराठी लेखन मार्गदर्शिका' हे त्यांचे पुस्तक आकाराला आले. ते पुस्तक आणि नंतरचा 'मराठी शब्दलेखनकोश' ही शेखबाईंची दोन्ही पुस्तके अभ्यासकांना खूप उपयुक्त ठरली आहेत.

निवृत्तीनंतर १९९६ साली शेख जोडपे पुण्यात औंध येथे स्थायिक झाले. आमच्या घराजवळच. त्यामुळे गाठीभेटीही अधिक सुलभ झाल्या. त्यांची धाकटी मुलगी मुंबईच्या शाळेत असताना माझ्याच वर्गात होती. 'अंतर्नाद' मासिकाच्या व्याकरण सल्लागार म्हणून त्यांचे मोलाचे सहकार्य मिळत गेले, हे मी माझे भाग्य समजतो. 'अंतर्नाद'च्या प्रत्येक अंकाची मुद्रिते त्या अगदी वेळेत तपासून देत. यजमान हृदयविकाराने रुग्णालयात अतिदक्षता कक्षात असतानाही त्यांनी 'अंतर्नाद'ची मुद्रिते तिथेच बसून तपासून दिली होती. यात आपण काही विशेष करतो असेही त्यांनी कधी मला जाणवू दिले नाही. 'अंकात एखादी चूक आढळली तर मला हातावर ओरखडा उमटल्यासारखं वाटतं', असे त्या एकदा म्हणाल्या होत्या. हाती घेतलेले काम जास्तीत जास्त चांगले करणे हीच त्यामागची भावना होती. भाषा हा आपला सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा आहे असे त्या मानत. भाषेच्या संदर्भात त्यांची काही आग्रही मते होती. उदाहरणार्थ, प्रमाणभाषेचा आग्रह. आजकाल वेगवेगळे समाजघटक आपापल्या बोलीचा आग्रह धरत असतात. शेखबाईंचा कुठल्याच बोलीभाषेला विरोध असा नव्हता. ललित साहित्यात वातावरणनिर्मितीसाठी बोलीभाषा आवश्यक असते, पण वैचारिक लेखनात मात्र प्रमाणभाषाच हवी, असे त्या म्हणत. नाहीतर झाडबोलीत केलेले लेखन कोकणातील वाचकाला कसे कळणार किंवा मालवणीत केलेले लेखन चंद्रपूरातील वाचकाला कसे समजेल? साधारण आशय संदर्भाने कळेलही, पण त्या आकलनात नेमकेपणा कसा येणार? महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा आहेत आणि प्रत्येकाने स्वतःच्याच बोलीभाषेत लेखन केले तर अनागोंदी माजेल, असे त्यांचे मत होते.

# मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी बीडच्या विकासाला नवी गती; १७ सप्टेंबरला रेल्वेची पुण्याशी तर डिसेंबरमध्ये मुंबईशी जोडणी

### कालबद्ध आराखडा तयार करून युद्ध पातळीवर काम करण्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सूचना

**■ मुंबई वृत्तसंस्था**

बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी 'बीड–पुणे' रेल्वे येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर धावणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक व सुरक्षाविषयक चाचण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच डिसेंबरअखेर बीड–मुंबई (पनवेल) रेल्वे सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व कामे युद्ध पातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिल्या.



सह्याद्री अतिथीगृह येथे 'अहिल्यानगर–बीड–परळी' रेल्वे मार्गाच्या प्रगतीचा आढावा तसेच 'बीड–पुणे' आणि 'बीड–मुंबई' रेल्वे सेवा सुरू करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मध्य रेल्वेचे मुख्य अभियंता (निर्माण) बी. के. सिंह, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, वरिष्ठ विभागीय अभियंता व्ही. पी. पैठणकर, सीसीएम डॉ. सुमंत देऊळकर, विल्यम केरी यांच्यासह रेल्वे व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बीडसह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी गती देणाऱ्या 'बीड–पुणे' आणि 'बीड–मुंबई' रेल्वे सेवेसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे 'अहिल्यानगर–बीड–परळी' या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाला गती मिळाली. गतवर्षी बीडकरांची ४० वर्षांची प्रतीक्षा संपवून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी (१७ सप्टेंबर २०२५ रोजी) 'बीड ते अहिल्यानगर' रेल्वे सेवा प्रत्यक्ष सुरू झाली आणि आता यावर्षी त्याच ऐतिहासिक दिनी 'बीड–पुणे' रेल्वे सेवा सुरू होत आहे.

'बीड–पुणे' रेल्वे सुरू झाल्यानंतर जिल्ह्याची पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राशी थेट व अधिक सक्षम रेल्वे जोडणी निर्माण होणार आहे. यामुळे बीडच्या कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक आणि व्यापार क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून नागरिकांच्या प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होण्यासही मदत होणार आहे. बीडच्या आर्थिक विकासासाठी हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सूचना देताना सांगितले की, १७ सप्टेंबर रोजी 'बीड–पुणे' रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी उर्वरित सर्व तांत्रिक, प्रशासकीय व सुरक्षाविषयक प्रक्रिया वेळेत पूर्ण कराव्यात. त्याचबरोबर डिसेंबरअखेर 'बीड–मुंबई' रेल्वे सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवून आवश्यक कामांचा कालबद्ध आराखडा तयार करून सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत.

येत्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या 'बीड–पुणे' रेल्वे सेवेच्या ऐतिहासिक शुभारंभ कार्यक्रमाची सर्व तयारी अत्यंत नियोजनबद्ध, प्रभावी आणि समन्वयाने करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या. 'बीड–पुणे' आणि पुढे 'बीड–मुंबई' ही केवळ रेल्वे सेवा नसून बीडच्या विकासाला जोडणारी नवी जीवनवाहिनी आहे. दिवंगत अजितदादांनी पाहिलेल्या विकसित बीडच्या स्वप्नपूर्तीसाठी या रेल्वे जोडणीची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी नमूद केले.




## बीड येथे राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा : गुणवंत खेळाडू व राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेत्या कविता गित्ते यांचा विशेष गौरव

**■ बीडः प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बीड आणि श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आणि राजमाता इंग्लिश स्कूल, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी 'राष्ट्रीय क्रीडा दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी मा. शिवकुमार स्वामी आणि पोलीस उप अधीक्षक मा. राजीव नवले यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रातील गुणवंत खेळाडू, राष्ट्रीय हॉकी खेळाडू क्षितीजा गव्हाणे, तसेच सन २०२६ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झालेल्या साने गुरुजी निवासी शाळा (केज) च्या आदर्श मुख्याध्यापिका श्रीमती कविता गित्ते (कराड) यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन विशेष गौरव करण्यात आला.

याप्रसंगी जिल्ह्यातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आणि अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला, तसेच मैदानी, सॉफ्टबॉल व बेसबॉल क्रीडा केंद्रांतील नियमित खेळाडूंना क्रीडा साहित्याचे (किट) वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी केवळ पदकांसाठी नव्हे, तर उत्तम शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी खेळाकडे पाहिले पाहिजे. खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले. पोलीस उप अधीक्षक राजीव नवले यांनी खेळाडूंना मेजर ध्यानचंद यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन राष्ट्रप्रेमाने खेळण्याचे आवाहन केले.

सत्कारमूर्ती कविता गित्ते यांनी या यशात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, सचिव प्रा. जे. पी. शेळके, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, डॉ. अविनाश बारगजे, प्रा. शिवाजीराव जगताप यांसह क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शज्ञानेश्वर कोटुळे यांनी केले तर आभार श्री. एस. सी. जगताप यांनी मानले.

## तपोवनचे सुपुत्र शिवशंकर (अण्णा) कराड यांचे निधन

### नामांकित कुस्तीगीर, शेतकरी व समाजसेवक हरपल्याने बीड जिल्ह्यात शोककळा

**■ परळी वैजनाथ / तपोवन, प्रतिनिधी :**

तपोवन येथील नामांकित कुस्तीगीर, कर्तव्यनिष्ठ शेतकरी, समाजसेवक तथा क्रीडाप्रेमी शिवशंकर (अण्णा) कराड यांचे अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्याने तपोवन परिसरासह संपूर्ण बीड जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच क्रीडा क्षेत्रातील खेळाडू, कुस्तीप्रेमी आणि विविध क्षेत्रातील नागरिकांनी तीव्र दुःख व्यक्त केले.

शिवशंकर अण्णा कराड हे तपोवन व नागपिंपरी येथील मातीशी घट्ट नाते जपणारे एक प्रसिद्ध कुस्तीगीर होते. ग्रामीण भागातील कुस्ती परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. विविध कुस्ती स्पर्धांमध्ये सहभाग घेत त्यांनी आपल्या कुस्ती कौशल्याच्या बळावर तपोवन, बीड जिल्हा आणि मराठवाड्याचे नाव उज्वल केले.ते बीड जिल्हा कुस्तीगीर महासंघाचे उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते.तसेच नागपिंपरी या गावचे माजी सरपंच होते, त्यांनी त्यांच्या कार्यकाळात उत्कृष्ट असे कामे केली आहेत. कुस्ती या पारंपरिक खेळाच्या विकासासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले. ग्रामीण भागात कुठेही कुस्ती स्पर्धा किंवा दंगल आयोजित करण्यात आली, तर ते आवर्जून उपस्थित राहत असत. खेळ आणि खेळाडूंप्रती असलेल्या त्यांच्या निस्सीम प्रेमामुळे ते कुस्ती क्षेत्रात सर्वांचे आप्तेष्ट बनले होते.

**कराड कुटुंबाची क्रीडा क्षेत्रातील समृद्ध परंपरा**

कराड कुटुंबाची क्रीडा क्षेत्रात एक समृद्ध परंपरा आहे. वैद्यनाथ महाविद्यालयातील क्रीडा क्षेत्राशी संबंधित डॉ. पी. एल. कराड यांचेही या क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. गावातील आखाडा आणि महाविद्यालयीन क्रीडा क्षेत्र या दोन्ही माध्यमांतून कराड कुटुंबाने क्रीडा संस्कृती जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.शिवशंकर (अण्णा )कराड यांचा स्वभाव अत्यंत मनमिळाऊ आणि हसतमुख होता. सामाजिक तसेच धार्मिक कार्यात त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असे. नियमित व्यायाम आणि शिस्तबद्ध जीवनशैली हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता.ते तरुण कुस्तीपटूंना मार्गदर्शन करीत असत. आपल्या अनुभवाच्या आधारे नवोदित खेळाडूंना कुस्तीचे तंत्र आणि शिस्तीचे धडे देत असत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक युवा खेळाडूंना प्रेरणा मिळाली.

**आदर्श पिता आणि कर्तव्यनिष्ठ शेतकरी**

शिवशंकर अण्णा कराड हे केवळ एक उत्कृष्ट कुस्तीगीर नव्हते, तर ते आदर्श पिता, कष्टाळू शेतकरी आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या कुटुंबामध्ये शिक्षण, शेती, सेवा आणि संस्कार यांचा सुंदर समन्वय साधला.क्रीडा क्षेत्रात त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे लहान बंधु प्राचार्य डॉ. चंद्रकांत कराड व त्यांचे पुतणे प्रा.डॉ. पी. एल.कराड उल्लेखनीय कार्य करत आहेत तसेच

त्यांचे पुत्र प्रा. रविकांत कराड हे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत, तर डॉ. शशिकांत कराड हे नामांकित दंतचिकित्सक आहेत. कुटुंबातील सदस्य विविध क्षेत्रांत कार्यरत असून कराड कुटुंबाची सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील परंपरा पुढे नेत आहेत.

त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अनेक नामांकित खेळाडू, कुस्तीप्रेमी आणि नागरिकांनी अंतिम दर्शनासाठी उपस्थिती लावली. यावरून समाजात आणि क्रीडा क्षेत्रात त्यांना असलेला आदर आणि प्रेम स्पष्ट झाले.

**वैद्यनाथ कॉलेजच्या वतीने श्रद्धांजली अर्पण**

शिवशंकर (अण्णा )कराड यांच्या निधनाबद्दल वैद्यनाथ कॉलेजच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ग्रामीण भागातील खेळाडूंसाठी ते प्रेरणास्थान होते. त्यांच्या निधनामुळे कराड कुटुंबासह तपोवन, नागपिंपरी व बीड जिल्हा आणि संपूर्ण मराठवाड्यातील क्रीडाप्रेमींची मोठी हानी झाली आहे.शिवशंकर (अण्णा ) कराड यांचे जीवन हे ग्रामीण युवकांसाठी प्रेरणादायी होते. कुस्ती, शेती, समाजसेवा, शिस्त आणि माणुसकी या मूल्यांचा त्यांनी आयुष्यभर आदर्श जपला.

## 'एक घास 32 वेळा चावा' हा नियम वापरून खरंच दुप्पट वेगाने पचन व झटपट वेटलॉस होतं?

प्रत्येक घास ३२ वेळा चावून खावा, असा सल्ला अनेकांनी लहानपणापासून ऐकला आहे. पण प्रत्येक घासासाठी ३२ हा काही ठोस वैज्ञानिक नियम नाही. अन्नाचा प्रकार, पोत आणि व्यक्तीच्या खाण्याच्या सवयींनुसार चावण्याची गरज बदलते. मात्र अन्न व्यवस्थित चावून आणि घाई न करता जेवल्याने पचनास मदत होऊ शकते आणि जास्त खाणे टाळण्यास मदत मिळू शकते. मग ३२ वेळा चावण्यामागचे सत्य काय? जाणून घ्या.

"प्रत्येक घास कमीत कमी ३२ वेळा चावून खाल्ला पाहिजे," हा सल्ला आपण बालपणापासून अनेकदा ऐकत आलो आहोत. हा ३२ चा आकडा इतका अचूक वाटतो की, अनेक लोक याला पचनक्रियेचा एखादा ठोस वैज्ञानिक नियम समजतात. परंतु, आपले शरीर आणि पचनसंस्था कोणत्याही ठराविक किंवा निश्चित आकड्याच्या नियमानुसार काम करत नाही. आजच्या अतिशय घाईगडबडीच्या जीवनशैलीत लोक अवघ्या पाच ते दहा मिनिटांत घाईघाईने जेवण संपवतात, ज्यामुळे अपचन, गॅस, पोट फुगणे आणि वजन वाढणे यांसारख्या समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत अन्न व्यवस्थित चावून खाणे आणि हळूहळू जेवणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, पण त्यासाठी प्रत्येक घास ३२ वेळाच मोजून चावला पाहिजे का?

### पचनक्रियेची सुरुवात आणि अन्न चावून खाण्याचे महत्त्व

पचनक्रियेची खरी सुरुवात ही पोटात नव्हे, तर आपल्या तोंडातूनच होते. जेव्हा आपण अन्न चावतो, तेव्हा दात अन्नाचे बारीक तुकडे करतात आणि त्यात तोंडातील लाळ (Saliva) व्यवस्थित मिसळली जाते. लाळेमध्ये असणारे पाचक एन्झाईम्स अन्नातील घटकांचे विघटन करण्यास सुरुवात करतात, ज्यामुळे अन्न सहजरीत्या गिळता येते आणि पोटात गेल्यावर त्यावर पाचक रसांची प्रक्रिया होणे सोपे जाते. परंतु, यासाठी '३२' या आकड्यात कोणतेही जादूई रहस्य नाही. शिजवलेला मऊ अन्नपदार्थ (उदा. वरण-भात किंवा मऊ फळ) फार कमी वेळा चावूनही बारीक होतो, तर फायबरयुक्त भाज्या किंवा कडक पदार्थांना जास्त वेळा चावावे लागते. त्यामुळे जबड्यांच्या हालचाली गणण्याऐवजी अन्न पुरेसे बारीक होईपर्यंत ते सहजतेने चावणे हा मुख्य उद्देश असावा.

### हळूहळू जेवल्याने पोट भरल्याची भावना आणि भूक नियंत्रण

अन्न चावून आणि हळूहळू खाण्याचा खरा फायदा भूक आणि तृप्ती नियंत्रणात (Appetite management) होतो. जेव्हा आपण खूप वेगाने किंवा घाईघाईत जेवतो, तेव्हा आपले पोट भरल्याचा संदेश मेंदूपर्यंत पोहोचण्याआधीच आपण गरजेपेक्षा जास्त अन्न खाऊन टाकलेले असते. पोटाकडून मेंदूला "पोट भरले आहे" हा संप्रेरकांचा (Hormones) संदेश मिळण्यासाठी सामान्यतः १५ ते २० मिनिटांचा वेळ लागतो. त्यामुळे जेवण हळूहळू आणि चावून खाल्ल्याने मेंदूला तृप्तीचा (Satiety) संकेत वेळेवर मिळतो, ज्यामुळे अवाजवी जास्त खाणे आपोआप टाळले जाते.

### वजन कमी होण्याबाबतचे वास्तव आणि ३२ वेळा चावण्याचा संबंध

प्रत्येक घास ३२ वेळा चावल्याने थेट चरबी जळते किंवा वेगाने वजन कमी होते, हा एक मोठा गैरसमज आहे. केवळ घास जास्त वेळा चावल्याने वजनात कोणताही चमत्कारिक बदल होत नाही. वजन कमी होणे हे प्रामुख्याने दिवसभरातील एकूण कॅलरीजचे सेवन, शारीरिक हालचाल आणि व्यायाम, आहाराचा दर्जा, पुरेशी झोप आणि शरीराचे चयापचय यावर पूर्णपणे अवलंबून असते. जर आहारातील पदार्थ अति-कॅलरीयुक्त, तेलकट किंवा साखरेचे असतील, तर ते कितीही वेळा चावून खाल्ले तरी वजन कमी होणार नाही. चावण्याची सवय ही केवळ जास्त खाण्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत करते, ती वजन कमी करण्याचे थेट औषध नाही.

### अन्नाचे लहान लहान घास घ्यावेत.

घाईघाईत न खाता जेवणासाठी पुरेसा वेळ द्यावा. या साध्या सवयींमुळे जेवणाचा वेग नैसर्गिकरीत्या मंदावतो. तसेच, ज्यांना दातांच्या समस्या आहेत, अन्न गिळायला त्रास होतो किंवा पचनाच्या तक्रारी आहेत, त्यांनी अन्न अधिक बारीक चावून खाण्यावर विशेष लक्ष दिले पाहिजे.

# रेती तस्करांना महसूलचा दणका! दोन ट्रॅक्टर जप्त

## हिवरा, जनुना येथे धडक कारवाई; प्रत्येकी एक ब्रास रेती जप्त, दंडात्मक कारवाई प्रस्तावित

**महागांव | प्रतिनिधी**

महागाव तालुक्यात सुरू असलेल्या अवैध रेती उपसा व वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल विभागाने आता धडक कारवाईचे हत्यार उपसले आहे. हिवरा आणि जनुना येथे करण्यात आलेल्या कारवाईत अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडून प्रत्येकी एक ब्रास रेती जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे रेती तस्करांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. प्रशिक्षणार्थी उपविभागीय अधिकारी ओमकार एकाळे आणि तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी गोविंद ठाकरे, बाळासाहेब माने, महसूल सहाय्यक दीपक चव्हाण व अक्षय बोनगुलवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

मंगळवारी रात्री हिवरा येथे अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर पथकाच्या निदर्शनास आले. तत्काळ कारवाई करीत हे वाहन ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर बुधवारी सकाळी जनुना येथेही रेतीची अवैध वाहतूक करणारे दुसरे ट्रॅक्टर पकडण्यात आले. दोन्ही वाहनांमध्ये प्रत्येकी एक ब्रास रेती असल्याचे मंडळ अधिकारी व तलाठ्यांनी केलेल्या पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. हिवरा येथे पकडण्यात आलेले ट्रॅक्टर समाधान धोत्रे, तर जनुना येथे पकडण्यात आलेले ट्रॅक्टर रोहित नरवाडे यांच्या मालकीचे असल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे.

दंडाच्या कारवाईकडे लक्ष अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन्ही वाहनांवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता तसेच गौण खनिजाच्या उत्खनन व वाहतुकीसंदर्भातील नियमांनुसार दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधितांकडून किती दंड वसूल होणार, याकडे लक्ष लागले आहे.

### तस्करीविरोधात मोहीम तीव्र होणार

महसूल विभागाने अवैध रेती उपसा आणि वाहतुकीविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, यापुढेही तालुक्यात मोठ्या प्रमाणावर तपासणी व कारवाईची मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशिक्षणार्थी उपविभागीय अधिकारी ओमकार एकाळे यांनी दिली. सलग दोन कारवायांमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत .



# परळीत दोन गटांत वाद, त्यानंतर थेट पोलीस ठाण्याच्या आवारात हाणामारी!




## संभाजीनगर पोलीस ठाण्यात 12 नावासह 15 ते 20 जणांवर गुन्हा दाखल

परळी | परळी येथील रेल्वे स्टेशन परिसरात झालेल्या भांडणानंतर दोन गट थेट पोलीस ठाण्यातच आमनेसामने आल्याची माहिती मिळत आहे. पोलीस ठाण्याच्या आवारातच सार्वजनिक शांतता भंग करत आपापसात मारहाण आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी संभाजी नगर पोलीस ठाण्यात 12 व्यक्तींसह इतर 15 ते 20 अनोळखी लोकांवर भारतीय न्याय संहिता 2023 च्या कलम 194(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक 31 ऑगस्ट 2026 रोजी रात्री 11:00 वाजण्याच्या सुमारास परळी रेल्वे स्टेशन परिसरात दोन गटांत जोरदार भांडण सुरू असल्याची माहिती 'डायल 112' वर तैनात पोलीस अंमलदार गणेश येरडलावार यांना मिळाली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले.

तेथे काही मुलांत आपापसात वाद सुरू होता. पोलिसांनी दोन्ही गटांना तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात येण्यास सांगितले.

दोन्ही गटांतील लोक रात्री 11:30 वाजण्याच्या सुमारास आपापले नातेवाईक व मित्रांना सोबत घेऊन संभाजी नगर पोलीस ठाण्यात आले. मात्र, तक्रार देण्याऐवजी दोन्ही गट पोलीस ठाण्याच्या आवारातच पुन्हा भिडले. त्यांनी एकमेकांना मारहाण व शिवीगाळ करत तुफान राडा केला.

या घटनेमुळे पोलीस ठाण्याच्या आवारात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थितीचे गांभीर्य पाहून सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मध्यस्थी करत वातावरण शांत केले. या प्रकरणी पोलीस अंमलदार गणेश येरडलावार यांच्या फिर्यादीवरून

15 ते 20 जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ठाकूर करत आहेत.

# शिशुगृहातील दोन बालकांच्या कायदेशीर नातेवाईकांचा शोध सुरू; 30 दिवसांनंतर दत्तक प्रक्रियेबाबत होणार निर्णय

**बीड | जिमाका**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत दत्तक प्रक्रियेच्या अनुषंगाने एक महत्त्वाची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिशुगृहात दाखल असलेल्या बालिका आयारा आणि बालक भार्गव या दोन बालकांच्या पालकांचा अथवा कायदेशीर नातेवाईकांचा शोध घेतला जात असून त्यांच्यासाठी ही जाहीर प्रसिद्धी देण्यात आली आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बालिका आयारा ही बालिका 17 एप्रिल



2025 रोजी शिशुगृहात दाखल झाली आहे. तर बालक भार्गव हा बालक 23 डिसेंबर 2024 रोजी शिशुगृहात दाखल झाला



आहे. या दोन्ही बालकांची माहिती आणि छायाचित्रे दत्तक प्रक्रियेसाठी पाठविण्यात आली आहेत. तत्पूर्वी कायद्यानुसार त्यांच्या मूळ पालकांचा किंवा नातेवाईकांचा शोध घेणे आवश्यक असल्याने प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून 30 दिवसांच्या आत संबंधित बालकांच्या पालकांनी किंवा नातेवाईकांनी आवश्यक पुराव्यांसह कार्यालयांशी संपर्क साधावा. जर दिलेल्या 30 दिवसांच्या मुदतीत कोणीही नातेवाईक समोर आले नाहीत, तर बालकल्याण समिती या बालकांच्या भविष्याबाबत आणि दत्तक प्रक्रियेबाबत कायद्यानुसार योग्य तो पुढील निर्णय घेईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# परळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवती तालुका अध्यक्षपदी अर्चना राठोड




**परळी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवती तालुका अध्यक्षपदी कु. अर्चना प्रकाश राठोड यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे अधिकृत पत्र युवती प्रदेशाध्यक्ष अमृताताई काळदाते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, तालुका संघटक गोपीनाथ चौरे, ग्रामपंचायत सदस्य कल्याण राठोड तसेच प्रकाश राठोड उपस्थित होते.

अर्चना राठोड यांच्या निवडीबद्दल पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या माध्यमातून परळी तालुक्यात युवती संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि पक्षाच्या विचारधारेचा प्रसार करण्यासाठी काम केले जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# पै.सुमितकुमार भारस्कर जागतिक कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघात

**वार्ताहार मारुंजी पुणे** | २३ वर्षाखालील जागतिक कुस्ती स्पर्धा अमेरिकेतील लास वेगास येथे दिनांक १२ ते १८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन जागतिक कुस्ती संघटना (uww) यांच्या मार्फत करण्यात आले आहे. जागतिक स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी भारतीय कुस्ती संघाची निवड चाचणी भारतीय कुस्ती महासंघ यांनी साई कुस्ती प्रशिक्षण केंद्र लखनौ येथे दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित केली. यामध्ये पै.अमोल बुचडे कुस्ती अकादमीचा पैलवान सुमितकुमार भारस्कर याने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत ७० किलो फ्री स्टाईल वजन गटात सहभाग घेतला. निवड चाचणीमध्ये सुमितकुमारची प्रथम कुस्ती हरियनाच्या रिन्कू कुमार विरुद्ध २-३ गुण फरकाने जिंकली. अंतिम कुस्ती दिल्लीच्या सिद्धार्थ विरुद्ध ५-१६ गुण फरकाने एकतर्फी जिंकून भारतीय संघात आपले स्थान पक्के केले आहे. सुमितकुमार याने यापूर्वी थायलंड येथे झालेल्या आशियाई चॅम्पियनशिप स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. जागतिक कुस्ती स्पर्धा ब्राटीस्लाव्हा



स्लोव्हाकीया येथे भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदक प्राप्त केली आहेत. सुमितकुमार पै. अमोल बुचडे कुस्ती अकादमी मध्ये मागील सहा वर्षापासून सराव करत आहे. महाराष्ट्र केसरी तथा रुस्तम ए हिंद पै. अमोल बुचडे यांच्या तंत्रशुद्ध, कलात्मक डावपेचांच्या शिकवणीतून हा प्रतिभावान खेळाडू तयार होत आहे. जागतिक स्पर्धेच्या तयारीसाठी भारतीय कुस्ती संघाचे सराव शिबिर अखिल भारतीय कुस्ती महासंघाच्या वतीने भारतीय खेळ प्राधिकरण (साई) लखनौ येथे सुरू आहे.

# भगवान महाविद्यालयात रक्षाबंधनाचा उत्साह; विद्यार्थ्यांनी जपला बंधुभावाचा संदेश

## राखी बांधून साजरा केला प्रेम, विश्वास आणि सामाजिक ऐक्याचा सण

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

भगवान महाविद्यालय आष्टी येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम मंगळवारी उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्यातील प्रेम, विश्वास, आपुलकी आणि परस्पर सन्मानाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाच्या निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य ज्येष्ठ प्राध्यापक ज्ञानदेव गाडे, पत्रकार आण्णासाहेब साबळे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थिनींनी विविध रंगांच्या आकर्षक राख्या बांधून या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनीही बहिणींच्या सन्मानाचे, सुरक्षिततेचे आणि त्यांच्या पाठीशी सदैव उभे राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कु विद्या नरवडे हिनी केले.

यावेळी मार्गदर्शन करताना जेष्ठ प्रा ज्ञानदेव गाडे म्हणाले की, “रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, आपुलकी, परस्पर आदर आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देणारा सण आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात स्त्री-सन्मान, समानता आणि सामाजिक सलोख्याची मूल्ये जोपासली पाहिजेत.”

रक्षाबंधनाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती आणि परंपरांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून देण्यात आले. तसेच समाजामध्ये परस्परांप्रती आदराची भावना वाढीस लागावी, जात-पंथ-धर्माच्या पलीकडे जाऊन बंधुभाव निर्माण व्हावा आणि सामाजिक ऐक्य मजबूत व्हावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी कु प्रतीक्षा शेंडगे हिने आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमामुळे महाविद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनी आनंदाने एकमेकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत कार्यक्रमात सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक अजहर शेख, प्रा निसार शेख, प्रा सचिन वाळके, प्रा अशोक लोखंडे, प्राध्यापिका जयश्री सोनवणे, प्रा रत्नमाला तरटे, प्रा मंदाकिनी काकडे, प्रा उज्वला पठारे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन कु अनुजा कदम तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु भक्ती सांगळे या विद्यार्थिनीने मानले.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, गुरुवार, ३ सप्टेंबर 2026



# जिद्द, चिकाटी अन् योग्य नियोजनाच्या जोरावर दूध व्यवसायातून उभारले स्वप्नातील घर; गायींच्या उपकाराची जाणीव ठेवत घरावरच उभारला गायीचा पुतळा

**संतोष सानप | आष्टी**

योग्य नियोजन, जिद्द आणि चिकाटी असेल तर कोणताही व्यवसाय यशस्वी करता येतो, याचा आदर्श ब्रह्मगाव येथील तरुण दूध व्यवसायिक सचिन हराळ यांनी घालून दिला आहे. दूध व्यवसायाकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून न पाहता त्याचे योग्य व्यवस्थापन, चाऱ्याचे नियोजन आणि सातत्यपूर्ण कष्ट यांच्या जोरावर त्यांनी या व्यवसायाला यशाच्या शिखरावर नेले. विशेष म्हणजे, दूध व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नातून त्यांनी आपल्या स्वप्नातील मोठे घर उभारले असून, ज्या गायींच्या माध्यमातून हे स्वप्न साकार झाले, त्या गायींच्या उपकाराची जाणीव ठेवत त्यांनी आपल्या घरावर गायीचा पुतळा उभारला आहे. त्यामुळे त्यांची ही कृती परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी केवळ कौतुकाचा विषय ठरली नसून, कष्ट, कृतज्ञता आणि यश यांचा सुंदर संदेश देणारी ठरत आहे.

काही वर्षांपूर्वी सचिन हराळ यांनी दूध व्यवसायाला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात व्यवसाय करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. कधी दुधाचे दर कमी झाले, तर कधी चारा आणि पशुखाद्याच्या वाढत्या खर्चामुळे व्यवसाय अडचणीत आला. मात्र, या संकटांपुढे हार न मानता त्यांनी व्यवसाय सुरूच ठेवला. दुधाचे दर कमी असतानाही त्यांनी गोठा बंद करण्याचा विचार केला नाही. उलट प्रत्येक अडचणीचा अभ्यास करून त्यावर मात करण्याचा प्रयत्न केला. व्यवसायामध्ये खर्च कमी करून उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी सर्वाधिक भर दिला तो स्वतःच्या शेतातून पौष्टिक चारा उपलब्ध करण्यावर.



ब्रह्मगाव हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जात असला तरी योग्य नियोजन केले तर कमी पाण्यातही चारा उत्पादन शक्य आहे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. स्वतःच्या शेतात वर्षातून तब्बल तीन वेळा मक्याचे पीक घेऊन त्यापासून मुरघास तयार करण्याचे नियोजन त्यांनी केले. या नियोजनामुळे वर्षातील तब्बल आठ ते नऊ महिने घरचा चारा उपलब्ध होण्यास मदत झाली. घरचा पौष्टिक चारा उपलब्ध झाल्याने बाहेरून चारा खरेदी करण्याचा मोठा खर्च वाचला आणि दूध व्यवसाय अधिक परवडणारा झाला. चारा, पशुखाद्य, जनावरांचे व्यवस्थापन आणि उत्पादन यांचा ताळमेळ साधत त्यांनी हा व्यवसाय हळूहळू मजबूत केला.

आज त्यांच्या गोठ्यातील गायींचे संगोपन, चाऱ्याचे नियोजन आणि व्यवसायाची पद्धत पाहता दूध व्यवसाय हा योग्य व्यवस्थापनाच्या जोरावर निश्चितच फायदेशीर ठरू शकतो, हे स्पष्ट होते. स्वतःच्या शेतातील चाऱ्यावर भर देत त्यांनी व्यवसायाचा खर्च नियंत्रित केला आणि अनेक वर्षांच्या कष्टातून एक यशस्वी दूध उत्पादक शेतकरी म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या या यशामागे केवळ गायींची संख्या वाढविणे नाही, तर उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर, सातत्यपूर्ण मेहनत आणि भविष्यातील नियोजन हे महत्त्वाचे सूत्र आहे.

> **“ कोणताही व्यवसाय करत असताना त्या व्यवसायातील अडचणी आपण पहिल्यांदा समजून घेतल्या पाहिजे. त्या अडचणी सोडवण्यासाठी आपण योग्य प्रयत्न केले पाहिजे त्याचबरोबर व्यवसाय करत असताना नेहमी नफ्याचा विचार न करता कधी कधी तोटा देखील सहन करावा लागतो. तोटा सहन करून व्यवसाय टिकवणे हे महत्त्वाचे आहे. मला देखील सुरुवातीच्या काळामध्ये अनेक अडचणीचा सामना करावा लागला. कधी दुधाचे दर पडले तर पशुखाद्याचे चाऱ्याचे दर वाढले. अशा वेळी उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत होता. परंतु अशा परिस्थितीत न डगमगता व्यवसाय टिकून ठेवला आणि आज या व्यवसायातून माझ्या स्वप्नातील घर साकार झाले आहे. - सचिन हराळ, दूध उत्पादक शेतकरी, ब्रह्मगाव**

विशेष म्हणजे, दूध व्यवसाय सांभाळतानाच सचिन हराळ हे सध्या ब्रह्मगावच्या उपसरपंचपदाची जबाबदारीही सांभाळत आहेत. गावचा कारभार पाहताना स्वतःचा दूध व्यवसाय आणि गोठा यांचीही ते तितक्याच शिस्तीने देखभाल करतात. सार्वजनिक जीवनातील जबाबदारी आणि व्यवसायातील कष्ट यांचा सुंदर समतोल त्यांनी साधला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे परिसरात कौतुक होत आहे.

दूध व्यवसायातून मिळालेल्या कमाईतून उभारलेल्या नवीन घराची ३० ऑगस्ट रोजी वास्तुशांती आणि गृहप्रवेश करण्यात आला. यावेळी घरावर उभारण्यात आलेल्या गायीच्या पुतळ्याचे अनावरण आमदार सुरेश धस यांच्या सुनबाई ऐश्वर्या जयदत्त धस यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह परिसरातील दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. घराच्या छतावर उभारलेला गायीचा पुतळा पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. आपल्या कष्टाने आणि गायींच्या माध्यमातून उभे राहिलेले हे घर म्हणजे केवळ संपत्तीचे प्रतीक नसून, आपल्या व्यवसायातील मुक्या जीवांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करणारे प्रतीक असल्याची भावना सचिन हराळ यांनी आपल्या कृतीतून व्यक्त केली आहे.

दूध व्यवसायात चढ-उतार येतात, संकटे येतात; मात्र योग्य नियोजन, स्वतःच्या शेतातील चाऱ्याची उपलब्धता, खर्चावर नियंत्रण आणि सातत्यपूर्ण कष्ट यांच्या जोरावर हा व्यवसाय निश्चितच यशस्वी करता येतो, हे सचिन हराळ यांच्या यशोगाथेने सिद्ध केले आहे. दुधाच्या कमाईतून उभे राहिलेले त्यांचे घर आणि घरावर विराजमान झालेला गायीचा पुतळा ही त्यांच्या संघर्षाची, यशाची आणि गायींबद्दलच्या कृतज्ञतेची प्रेरणादायी निशाणी ठरली आहे.

# विदर्भाच्या सुपुत्राचा पुण्यामध्ये गौरव

**अमरावती |** जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील मु-र्हा देवी येथील रहिवासी तसेच मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिक व संशोधक त्याचप्रमाणे मिशन आयएएस या चळवळीचे पुण्याचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रामदास चवरे यांचा नुकताच पुणे येथे भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता. पुण्याच्या सुप्रसिद्ध अशा काव्य मित्र या साहित्यिक संस्थेने त्यांच्या ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. रामदास चवरे यांनी नुकतीच वयाची 75 वर्ष पूर्ण केलेली आहेत त्यानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन बाणेर परिसरातील श्री संत ज्ञानेश्वर भवनांमध्ये करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीमती साधनाताई पोहरे हया होत्या. तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विचारवंत डॉ. ईश्वर आगरवाल तसेच पुण्याच्या फॉरेस्टिकचे माजी उपसंचालक श्री राजेंद्र कोंकरे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात संयोजक व कवी श्री राजेंद्र विमल श्रीमंत सगर यांच्या प्रास्ताविकाने झाले. श्री राजेश पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्राचार्य डॉ. रामदास चवरे यांनी वयाची 75 वर्षे पूर्ण




केल्याबद्दल तसेच त्यांच्या अद्वितीय अशा साहित्य सेवेबद्दल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सर्वश्री प्राचार्य डॉ. अशोक देशमुख प्रा. रामेश्वर डांगे व प्रा डॉ.सौ. मृणालिनी लिमये यांनी प्राचार्य डॉक्टर रामदास चवरे यांच्या जीवन प्रवासावर प्रकाश टाकला. याप्रसंगी काव्यमित्र संस्थेतर्फे प्राचार्य डॉ. रामदास चवरे यांचा शाल श्रीफळ सन्मानचिन्ह व पुणेरी पगडी घेऊन सत्कार करण्यात आला त्याचबरोबर त्यांच्या अर्धांगिनी प्रा. डॉ.सौ सीमा रामदास चवरे यांना देखील शाल व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला पुण्यातील साहित्य क्षेत्रातील मान्यवर मंडळी बहुसंख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाची सांगता प्राचार्य डॉ. अशोक पाटील यांच्या आभाराने झाली.

# छायाचित्र संघटनेच्या वतीने भगवान बाबा जयंती साजरी



राष्ट्रसंत तमाम महाराष्ट्राचे दैवत संत भगवान बाबा यांची जयंती छायाचित्रकार संघटनेच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी भगवान बाबा यांच्या प्रतिमेला पदाधिकारी यांनी पुष्पहार व इतर सर्व छायाचित्रकारांनी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले यावेळी बहुसंख्य छायाचित्रकार उपस्थित होते. भगवान बाबांचा जयजयकार करीत व त्यांच्या सामाजिक आध्यात्मिक कार्य व कार्याचे स्मरण करण्यात आले. हा कार्यक्रम फुलारी फोटो स्टुडिओ येथे घेण्यात आला. सोमेश्वर मुंडे यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले.

# आश्रमशाळांच्या प्रश्नांवर राज्यभरातील संस्थाचालकांची महागावात एकजूट

## राज्यस्तरीय बैठकीत विविध प्रश्नांवर सखोल चर्चा; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह थकीत अनुदानाचा मुद्दा ऐरणीवर

**महागाव | प्रतिनिधी**

राज्याच्या कानाकोपऱ्यातील आश्रमशाळा संस्थाचालकांची राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण बैठक महागाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. वनमालाताई राठोड यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस राज्यभरातून सुमारे २५० ते ३०० संस्थाचालक उपस्थित होते. आश्रमशाळांसमोरील विविध प्रश्न, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शासनाची भूमिका, थकीत अनुदान तसेच आगामी काळातील आव्हाने यावर बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीच्या प्रारंभी गडचिरोली जिल्ह्यातील आश्रमशाळेत सर्पदंशामुळे दुर्दैवी मृत्यू झालेल्या तीन विद्यार्थिनींना तसेच उदगीर येथील श्री. श्रीधर राठोड यांच्या निधनाबद्दल उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संस्थाचालक रामदास चव्हाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा संस्थाचालक संघटनेचे अध्यक्ष शेषराव चव्हाण यांच्यासह बाबासाहेब कांबळे, मानवेंद्र केंद्रे, राजेंद्र चव्हाण, भाऊराव जाधव, राम राठोड, माधव वैद्य, जिल्हा परिषद लातूरच्या सदस्या शालिनीताई रामदास चव्हाण, माजी आमदार उत्तमराव इंगळे, सुधाकर मोरे, ॲड. सुधाकर जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची रूपरेषा व प्रास्ताविक प्रियदर्शनी शिक्षण




संस्थेच्या सचिव मा. वनमाला राठोड यांनी केले.

यावेळी मंत्री महोदयांसोबत झालेल्या बैठकीतील चर्चेची तसेच शासनाच्या भूमिकेची सविस्तर माहिती शेषराव चव्हाण यांनी उपस्थित संस्थाचालकांना दिली. आश्रमशाळांच्या विविध प्रश्नांवर शासनस्तरावर झालेली चर्चा आणि त्याबाबतची सद्यस्थिती राज्यभरातील संस्थाचालकांपर्यंत पोहोचविणे हा बैठकीचा प्रमुख उद्देश होता.

“आश्रमशाळा वाचविण्यासाठी, त्यांची गुणवत्ता टिकविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने काम केले पाहिजे,” असा सूर बैठकीत व्यक्त करण्यात आला. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाबरोबरच आवश्यक शैक्षणिक, निवासी, भोजन, सुरक्षा आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

आगामी काळात विविध शासकीय विभागांकडून आश्रमशाळांची तपासणी होणार असल्याने प्रत्येक संस्थेने आपल्या शाळेतील शैक्षणिक, प्रशासकीय, निवासी व भोजन व्यवस्था, विद्यार्थ्यांची सुरक्षा तसेच भौतिक सुविधांची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या.

आश्रमशाळांसमोरील वाढती आव्हाने, शासनाच्या प्रस्तावित उपाययोजना आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण यावर उपस्थित संस्थाचालकांनी सविस्तर चर्चा केली. आश्रमशाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून हजारो भटके-विमुक्त आणि वंचित विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेली महत्त्वपूर्ण व्यवस्था आहे. त्यामुळे आश्रमशाळांचे संरक्षण, संवर्धन आणि गुणवत्तावाढीसाठी शासन व संस्थाचालकांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता यावेळी व्यक्त करण्यात आली.

तसेच गडचिरोली येथील दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर संस्थाचालकांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबतही उपस्थितांनी चिंता व्यक्त केली. नैसर्गिक अथवा आकस्मिक घटनांमध्ये वस्तुस्थितीची योग्य चौकशी करूनच जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यासोबतच आश्रमशाळांना मिळणारे थकीत अनुदान तातडीने वितरित करून विद्यार्थ्यांच्या भोजन, निवास आणि शैक्षणिक सुविधांमध्ये कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, अशी मागणीही करण्यात आली.

राज्यभरातील संस्थाचालकांनी एकत्र येत आश्रमशाळांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केल्याने महागाव येथील ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिलभाऊ राठोड व राजु कावडे यांनी केले तर आभार जय वानखेडे व विनोद राठोड यांनी मानले.राष्ट्रगीताने बैठकीचा समारोप करण्यात आला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायालय अंतर्गत)